**दिवाणी किरकोळ अर्ज कमांक १/२०१८**
**CNR MHBI060000192018**

**महेबुब व इतर ७**

**वि.**

**कोणी नाही.**

**निशाणी कमांक १ वरील आदेश.**

अर्जदार क्रमांक १ ते ८ यांनी वारसाप्रमाणपत्र मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जातील कथन असे की, अर्जदार क्रमांक १, २,४,ते ८ चे वडिल व अर्जदार क्रमांक ३ चे पती नामे शेख रजबोद्दीन पि. सुलेमान हे दिनांक ०१.०९.२०१७ रोजी आजारपणाममुळे मयत झाले आहेत. मयताच्या नावे महावितरण विद्युत मंडळ शाखा अंबाजोगाई येथे मिटर ग्राहक क्रमांक ५७१०१००८६४८२ असुन त्यांच्या नावाची नोंद आजतागायत आहे. अर्जदार क्रमांक १ ते ८ हेच मयतास एकमेव कायदेशीर वारस असल्यामुळे, त्यांच्या जागी अर्जदारांच्या नावाची नोंद करण्यासाठी वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून हा अर्ज दाखल केला आहे.

२. सदर अर्जास कोणाचा आक्षेप आहे काय, यासाठी जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला होता. निशाणी ११ प्रमाणे 'दै.अंबाजोगाई वार्ता' या वृत्तपत्रामध्ये मध्ये दिनांक ०४.०१.२०१८ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. पंरतू विहीत मुदतीत कोणी हजर होऊन आक्षेप नोंदवलेला नाही.

३. अर्जदार तर्फे विधिज्ञ व्ही.एस.डांगे यांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदारांचे नावे वारसाप्रमाणपत्र देण्याबाबत अर्जदार क्रमांक १ महेबुब रजबोद्दीन शेख यांनी शपथपत्र नि. क्र. १७ येथे दाखल केले आहे. अर्जदारांनी निशाणी क्रमांक ३ चे यादीसोबत, मयताचा मृत्यु दाखला निशाणी ४, निशाणी १० चे यादीसोबत अर्जदार क्रमांक १ ते ५ यांच्या आधारकार्डच्या पडताळणीप्रती आणि निशाणी २० चे यादीसोबत अर्जदार क्रमांक ६ ते ८ यांच्याा आधारकार्डच्या पडताळणीप्रती निशाणी २१ ते २४ ही कागदपत्रे दाखल केली आहेत. जाहीरनामा प्रसिध्दीकरण केल्यानंतर सदर अर्जास कोणी आक्षेप नोंदवला नाही. अर्जास कोणी हरकत नोंदविली नसल्याने व अर्जदाराचा पुरावा विचारात घेऊन अर्जातील कथन ग्राहय मानण्यात येते. अर्जदार क्रमांक १ ते ८ हेच मयत शेख रजबोद्दीन पि.सुलेमान यांचे कायदेशीर वारस असल्याचे सकृतदर्शनी सिध्द होते.

४. अर्जात खालीलप्रमाणे आदेश केला.

## **आदेश**

१ अर्ज मंजूर केला.

२ अर्जदार क्रमांक १ ते ८ हे मयत शेख रजबोद्दीन पि.सुलेमान यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला अर्जदारांचे नावे आवश्यक ते न्यायालयीन शुल्क दिल्यानंतर देण्यात यावा.

स्वाक्षरीत/-
( अ.बा. कुरणे )
सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,
अंबाजोगाई.

दि. ०४.०४.२०१८